# नियमित दिवाणी दावा क्र. १५२/२०२१ मधील नि. ३४ वरील आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००३७३–२०२१)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र. ८ सुलोचना अनिल येडे ह्या दिनांक २७/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर मुदतीत घेणे गरजेचे होते, परंतु वादी यांचे कायदेशीर अज्ञानामुळे व मृत्यू दाखला उशीराने मिळाल्याने वारस मुदतीत घेणे शक्य झाले नाही. मयत प्रतिवादी क्र. ८ यांना पती, दोन मुली व दोन मुलगी असे वारस आहेत. त्या वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ८ चे सदर वारस रेकॉर्डवर घेण्यास व तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी, असे वादी यांचे कथन आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन कथन केले की, अर्ज खोटा आहे. अर्जात नमुद केलेले वारस अपुर्ण आहेत. वादीने जाणून बुजुन खोटया स्वरुपाचा अर्ज दिला असून तो ढोबळ स्वरुपाचा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे प्रतिवादी यांचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि. २९/१ येथे दाखल मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. ८ ह्या दिनांक २७/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. प्रस्तुत दावा वाटपाचा व मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ८ चे वारस आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकाराचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक आहे. नि. ३० वरील आदेशानुसार वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात आला आहे तसेच नि. ३२ वरील

आदेशानुसार प्रतिवादी क्र. ८ विरुध्द झालेला अबेट हुकूम रद्द करण्यात आला आहे. सर्व आवश्यक पक्षकाराचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने मयत प्रतिवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेण्यास वादीला परवानगी देणे न्यायोचित ठरणार आहे. मयत प्रतिवादी क्र. ८ चे सर्व वारस वादीने सामील केले आहेत अगर कसे ही बाब चौकशीवेळी गुणदोषावर निर्णित होणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि. ३४ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ३४ येथील अर्जातील विनंतीनुसार वादपत्रातील मथळा सदरात दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार दुरुस्ती करुन वादीने दुरुस्त वादपत्र दाखल करावे.

GIRISH MADHUKAR SADHALE

Digitally signed by GIRISH MADHUKAR SADHALE
Date: 2023.08.05 18:46:44 +0530

श्रीगोंदा.

दिनांक ०५/०८/२०२३.

**( जी. एम. साधले )**
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.